**शपथेवर सरतपास गैरअर्जदार यांच्या तर्फे अधिवक्ता श्री ए.एम. चानकापुरे :—**

०४. आता मला माझे शपथपत्र **नि. सी. २४** दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. नि. सी.—२१ बॅकेची सेवा नियमावली मला दाखवीली. कागदपत्र नि. स—१९ बी वरील अनु.कं. २ व ३ वरील दिनांक ३०.०७.२०१९ व २५.०४.२०१८ रोजीचे संचालक सभेचे इतिवृत्ताची सत्यप्रती मला दाखवील्या त्यावर बॅकेचे शिक्के आहे व त्यावर सहव्यवस्थापक यांच्या सह्या आहेत. सदर सत्यप्रती हया मुळ रेकॉर्डवरुन प्रमाणीत केल्या आहेत त्यास **नि. सी—२५ व सी —२६** देण्यात येते. कागदपत्र नि. सी—१९ बी वरील अनु.कं. ४ वरील प्रभारी व्यवस्थापक यानी सहायक व्यवस्थापक याना दि १८.१.२०२१ रोजी दिलेल्या पत्राची प्रत मला दाखवीली त्यास **नि. सी—२७** देण्यात आले. कागदपत्र नि. स—१९ बी वरील अनु.कं. ५ वर मला अर्जदाराचा खाते उतारा दाखवीला त्यावर बॅकेचा शिक्का आहे त्यास **नि. सी—२८** देण्यात आले. कागदपत्र नि. सी—२३ सोबत भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब अन्वये दिलेले प्रमाणपत्र मला दाखवीले त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. सी—२९** देण्यात येते.

सरतपास पूर्ण झाला.

**दोन्ही वकालांचे तोंडी विनंतीने उलटतपास तहकुब करण्यात आला.**

समक्ष

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/—

(अ. दा. तिडके)

न्यायाधीश

दि. १०.१०.२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर